आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

८ डिसेंबर २०२४ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्य विधानसभेच्या अध्यक्ष पदावर आमदार राहुल नार्वेकर यांची बिनविरोध निवड

- विरोधकांचा शपथविधीवरचा बहिष्कार मागे

- देशाच्या सीमा संरक्षणाला मजबुती देण्याचं काम सीमा सुरक्षा दल करत असल्याचं अमित शहा यांचं प्रतिपादन

- बॉर्डर-गावस्कर करंडक कसोटी क्रिकेट मालिकेतल्या दुसऱ्या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा भारतावर १० गडी राखून विजय, मालिकेत १-१ अशी बरोबरी

**आणि**

- फेंजल चक्रीवादळाचा परिणाम ओसरल्याने राज्यात पुन्हा गारठा वाढणार असा हवामान विभागाचा अंदाज.

**<><><><><>**

राज्य विधानसभेच्या अध्यक्ष पदावर आमदार राहुल नार्वेकर यांची बिनविरोध निवड झाली आहे. आज दुपारी नार्वेकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत अध्यक्ष पदासाठी अर्ज दाखल केला होता. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. विधानसभा अध्यक्षपदासाठी आज दुपारी बारा वाजेपर्यंत अर्ज दाखल करण्याची मुदत होती. मात्र, अन्य कोणाचाही अर्ज दाखल न झाल्यानं नार्वेकर यांची निवड  बिनविरोध होत आहे.

**<><><><><>**

राज्य विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनाच्या आजच्या दुसऱ्या दिवशी तात्पुरते अध्यक्ष कालीदास कोळंबकर यांनी १०५ नवनिर्वाचित आमदारांना विधानसभा सदस्यत्वाची शपथ दिली. काल अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी १७३ नवनिर्वाचित आमदारांनी शपथ घेतली होती. महाविकास आघाडीच्या नवनिर्वाचित आमदारांनी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांच्या वापराला निषेध म्हणून काल शपथ घ्यायला नकार दिला होता. आज अधिवेशनाचं कामकाज सुरु होण्याआधी महाविकास आघाडीच्या नेत्यांची बैठक झाली, त्यात बहिष्कार मागे घेऊन सदस्यत्वाची शपथ घेण्याचा निर्णय झाला.

शपथविधीनंतर सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. आज शपथ घेतलेल्यांमध्ये नाना पटोले, राधाकृष्ण विखे पाटील, दिलीप सोपल, मंगलप्रभात लोढा, नितीन राऊत, विजय वडेट्टीवार, चंद्रशेखर बावनकुळे, भास्कर जाधव, जितेंद्र आव्हाड, अब्दुल सत्तार, अमित देशमुख, अस्लम शेख, तानाजी सावंत, आदित्य ठाकरे यांचाही सहभाग होता. अजुनही विनय कोरे, जयंत पाटील, उत्तम जानकर, शेखर निकम, विलास भुमरे, वरुण सरदेसाई, मनोज जामसुतकर आणि सुनील शेळके असे आठ सदस्यांचा शपथविधी शिल्लक आहे.

दरम्यान सत्ताधारी महायुतीच्या सदस्यांनी आज विधानभवनाच्या पायऱ्यांवर इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या समर्थनार्थ घोषणाबाजी केली आणि इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा विरोध करणाऱ्या महाविकास आघाडीचा निषेध केला. सदा खोत, गोपीचंद पडळकर, विजय देशमुख, बालाजी किणीकर हे सदस्य या घोषणाबाजीत सहभागी झाले होते. तत्पूर्वी ईव्हीएमवर शंका घेणं हा संविधानाचा अपमान असल्याची टीका भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. ते म्हणाले....

**होल्ड बाईट - चंद्रशेखर बावनकुळे**

**<><><><><>**

मतपत्रिकेवर मतदान घेण्यावरून चर्चेत आलेल्या सोलापूर जिल्ह्यातल्या मारकडवाडी गावाला ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आज भेट देऊन नागरिकांशी संवाद साधला. यावेळी आमदार उत्तम जानकर हे देखील उपस्थित होते. मारकडवाडी ग्रामस्थांनी स्वतःच्या मतांची पडताळणी करण्यासाठी मतपत्रिकेवर मतदान घेण्याचा निर्णय घेतल्यास त्यावर प्रशासनानं आक्षेप घेण्याचं काहीही कारण नाही, असंही ते म्हणाले. मतपत्रिकेवर मतदान घेण्यासाठी गावोगावी ठराव घेण्याची सूचना त्यांनी दिली. लोकशाही टिकविण्यासाठी ईव्हीएम मशीन नको ही चळवळ अधिक तीव्र करण्याची गरज आहे, असं ते म्हणाले.

मारकडवाडीतल्या लोकांचं प्रतिज्ञापत्र घेऊन निवडणूक आयोगाला भेटणार असल्याचं आमदार उत्तम जानकर यावेळी म्हणाले. निवडणूक आयोग जर मतपत्रिकेवर निवडणूक घ्यायला तयार असेल तर आपणही आमदारकीचा राजीनामा देऊन पुन्हा निवडणूक लढवण्यास तयार आहोत, असं जानकर यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राज्यघटनेतल्या तरतुदींनुसार निवडणूक आयोग स्वायत्त संस्था आहे, मात्र निवडणूक आयुक्त निवडण्याच्या प्रक्रियेत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी फेरफार केले. अप्रत्यक्षपणे सरकारच आयुक्तांची नेमणूक करीत असून त्यामुळे आयोग सरकारला अपेक्षितच काम करतो, असा आरोप माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केला आहे. सातारच्या काँग्रेस भवन मध्ये आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.

निवडणूक आयोगाची स्वायत्तता धोक्यात आली असून, त्याची कार्यपध्दती आता सरकारी खात्याप्रमाणेच झाली आहे असं ते म्हणाले. मतदानासाठी ईव्हीएम वापराविरोधात देशव्यापी आंदोलन छेडणार असल्याचं सांगून त्याअंतर्गत, सह्यांची मोहम राबवणार असल्याचं चव्हाण यांनी सांगितलं.

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

८ डिसेंबर २०२४ - रविवार

**<><><><><>**

सीमा सुरक्षादल गेली ६ दशकं देशाच्या सीमा सुरक्षेला मजबुती देण्याचं महत्त्वपूर्ण काम करत आहे, असं प्रतिपादन केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांनी केलं. ते आज जोधपूरमध्ये सीमा सुरक्षा दलाच्या ६०व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. सीमा सुरक्षा दलाच्या योगदानाशिवाय देशासमोरच्या सुरक्षा आव्हानांना सामोरं जाणं अशक्य असल्याचंही ते म्हणाले.

जोधपूरमधल्या सीमा सुरक्षा दलाच्या राजस्थान फ्रंटिरियर हेडक्वार्टरमध्ये पहिल्यांदाच संचलनाचं आयोजन करण्यात आलं आहे. संचलनात स्वदेशी हेलिकॉप्टर ध्रुव आणि एमआय१७ देखील सहभागी झाली आहेत. यासोबतच श्वानपथकही या कार्यक्रमात सहभागी झालं असून या कार्यक्रमात ७ सैनिकांना शौर्य पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं.

या कार्यक्रमाचा आकाशवाणी वृत्तांत आज रात्री ८ वाजता प्रसारित करण्यात येणार आहे. आकाशवाणी मुंबई केंद्रावरुन रोज रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणारं राष्ट्रीय बातमीपत्र आज रात्री साडेआठ वाजता प्रसारित होईल.

**<><><><><>**

भारत आणि ऑस्ट्रेलियाच्या महिला क्रिकेट संघांमध्ये आज ब्रिस्बेन इथं झालेल्या दुसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात ऑस्ट्रेलियानं भारतावर १२२ धावांनी विजय मिळवला. या विजयासोबत ऑस्ट्रेलियानं तीन सामन्यांच्या मालिकेत २-० अशी आघाडी घेतली आहे.

या सामन्यात ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. त्यानंतर जॉर्जिया आणि एलिसे यांच्या शतकी खेळींच्या जोरावर निर्धारीत ५० षटकांत ८ बाद ३७१ धावा केल्या. विजयासाठी ३७२ धावांचा पाठलाग करताना भारताचा संपूर्ण संघ ४४ षटकं आणि ५ चेंडूंमध्ये २४९ धावा करून माघारी परतला. भारताच्या वतीनं सलामीला आलेल्या ऋचा घोष हीनं सर्वाधिक

५४ धावा केल्या, तर ऑस्ट्रेलियाच्या ॲनाबेल हीनं भारताच्या चार खेळाडूंना बाद केलं.

मालिकेतला तिसरा आणि अखेरचा सामना येत्या ११ डिसेंबरला पर्थ इथं होणार आहे.

**<><><><><>**

दुबई इथं सुरू असलेल्या १९ वर्षांखालच्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात बांग्लादेशानं भारतासमोर विजयासाठी १९९ धावांचं आव्हान ठेवलं आहे.

या सामन्यात भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. भारताच्या गोलंदाजांनी देखील बांग्लादेशाच्या फलंदाजीला लगाम घालत, त्यांचा संपूर्ण संघ १९८ धावांतच तंबूत धाडला. बांग्लादेशाच्या वतीनं मोहम्मद रिझान यानं सर्वाधिक ४७ धावा केल्या. भारताच्या युद्धजीत, चेतन आणि हार्दिक यांनी प्रत्येक दोन गडी बाद केले.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या ७ षटकात २ बाद २८ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

बॉर्डर गावस्कर करंडक कसोटी क्रिकेट मालिकेतला ॲडलेड इथं झालेल्या दुसऱ्या दिवसरात्र सामन्यात ऑस्ट्रेलियानं भारताचा १० गडी राखून पराभव केला. या विजयासोबतच ऑस्ट्रेलियानं पाच सामन्यांच्या मालिकेत १ - १ अशी बरोबरी साधली आहे.

आज सामन्याच्या तिसऱ्या दिवशी भारतानं आपला दुसरा डाव ५ बाद १२८ धावसंख्येवरून पुढे सुरू केला. मात्र दिवसाच्या पहिल्याच षटकात ऋषभ पंत माघारी परतला. त्यानंतरही भारताचे फलंदाज ठराविक अंतरानं बाद होत गेले आणि भारताचा दुसरा डाव केवळ १७५ धावांतच आटोपला. ऑस्ट्रेलियाचा

कर्णधार पॅट कमिन्स यानं भारताचा निम्मा संघ बाद केला. भारताच्या वतीनं नितीश रेड्डी यानं सर्वाधिक ४२ धावा केल्या.

ऑस्ट्रेलियानं पहिल्या डावात भारतावर १५७ धावांची आघाडी घेतली होती. त्यामुळे दुसऱ्या डावात त्यांच्यासमोर विजयासाठी केवळ १९ धावांचं आव्हान उरलं. ते ऑस्ट्रेलियानं एकही गडी न गमावता पूर्ण केलं. पहिल्या डावातला शतकवीर ट्रॅव्हिस हेड याला सामनावीराच्या किताबानं गौरवलं गेलं. मालिकेतला तिसरा सामना येत्या १४ डिसेंबरपासून ब्रिस्बेन इथं होणार आहे.

**<><><><><>**

गेल्या आठवड्यात तामिळनाडूच्या समुद्रात तयार झालेल्या फेंजल चक्रीवादळाच्या प्रभावामुळे राज्यातल्या थंडीत घट होऊन ढगाळ वातावरण तयार झालं होतं. मात्र, फेंजलचा प्रभाव ओसरल्यानंतर आता पुन्हा राज्यात थंडी परतण्याची शक्यता आहे. पुढच्या दोन दिवसात राज्यात काही भागात हलक्या सरींची शक्यता असली तरी उर्वरित भागात हवामान कोरडे होण्यास सुरुवात झाल्यानं आता राज्यात गारठा वाढणार असल्याची माहिती हवामान विभागानं दिली आहे.

**//<><><><><>//**